क्रं. 2011/जिबी/डेस्क-1/जिपपंसनि/सिआर-45
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.
दि. 10/01/2012

# जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक- 2012
## व्हिडीयो शुटींग बाबत दरपत्रक मागविणे बाबत.

सर्व व्हिडियो शुटींग धारकांना सूचित करण्यात येते की, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूका 2012 च्या कामासाठी दिनांक 18/01/2012 ते 08/02/2012 (22) दिवसासाठी नांदेड जिल्हयातील सर्व जिल्हा परिषद पंचायत समिती मतदार संघासाठी व्हिडीयो शुटींग करावयाची आहे. त्यासाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रकाच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

1. सदर दरपत्रक दिनांक- 13/01/2012 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत या कार्यालयात जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक विभागात सादर करावे लागेल. यानंतर येणा-या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
2. व्हिडीयो शुटींग धारकास दिनांक 18/01/2012 ते 08/02/2012 या कालावधीत जिल्हयात कोणत्याही निवडणूक निर्णय अधिका-याकडे नियुक्ती दिल्यास त्यांचेकडे स्वखर्चाने जावे लागेल.
3. किमान (16) व्हिडीयो संच सुव्यवस्थित असावयास पाहिजेत. त्याबाबतची माहिती द्यावी.
4. प्रतिदिन भाडयाचा दर नमूद करावा.
5. दरपत्रकासोबत रुपये 5,000/- एवढया रकमेचा राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष प्रमुख **लिपीक, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड** यांच्या नावे काढून दरपत्रकासोबत द्यावा लागेल. अन्यथा दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
6. व्हिडीओ शुटींग धारकाकडे पूरेसे संच असणे अपेक्षित आहे. तथापी संच कमी असल्यास त्यांना सर्वात कमी असलेल्या दरपत्रकाप्रमाणे काम करावे लागेल.
7. व्हिडीओ शुटींगच्या भाडयाच्या रकमेची अदायी करतांना जे कर कपात करून घेणे कायदेशीर बंधनकारक आहे जसे, आयकर इत्यादी रकमेची कपात करुन घेण्यात येईल.
8. निवडणूकीच्या कालावधीत व्हिडीओ शुटींग उपलब्ध देण्याकामी कसुर केल्यास पर्यायी व्यवस्था तात्काळ करुन द्यावी लागेल. पर्यायी व्यवस्था न केल्यास सर्व दिवसाच्या भाडयाची रक्कम देय राहणार नाही व अनामत रक्कम जप्त होईल.
9. सदर दरपत्रके दि.13/01/2012 रोजी दुपारी 04.00 वाजता उपजिल्हाधिकारी (जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक विभाग) जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्या दालनात उघडण्यात येतील. दर पत्रक धारकाने त्यावेळेस उपस्थीत रहावे.
10. कोणतेही कारण न दर्शविता दरपत्रके स्विकारणे / नाकारण्याचे अधिकार मा.जिल्हाधिकारी नांदेड यांना राहतील.

उपजिल्हाधिकारी
जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक
विभाग
जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड